शुक्रवार, २६ मे २०२३ सकाळ

# संजीवनी महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत यश

चाकूर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत चापोली (ता. चाकूर) येथील संजीवनी महाविद्यलाचा निकाल ९२.९३ टक्के लागला आहे. महाविद्यालयातील विज्ञान, कला व वाणिज्य शाखेतून ८७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यातील ८१५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेचा ९६ टक्के, कला शाखेचा ८६ टक्के तर वाणिज्य शाखेचा ९५.८३ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतून सायली मनोज मुंढे ही विद्यार्थीनी ८४.८३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच आदित्य प्रकाशराव फड ८३.६६ टक्के, ऋतुजा कदम ८३ टक्के गुण मिळाले आहेत. वाणिज्य शाखेतून निशा माधव गुंजाळे ७६.६६ टक्के, वेदिका नामदेव चिटलवाड यांनी ७६.१६ टक्के, प्रतीक्षा कांबळे ७६ टक्के गुण मिळविले आहेत. कला शाखेतून शुभांगी व्यंकटी कांबळे ७९.६६ टक्के, स्वाती उमाकांत हाळनर यांनी ७९ टक्के, ओम सदानंदे ७६ टक्के गुण मिळविले आहेत. यंदाच्या निकालात महाविद्यालयातून मुलींनीच बाजी मारलेली आहे. या विद्यार्थ्यांचे डॉ. धनंजय चाटे, उपप्राचार्य डॉ. भालचंद्र चाटे, विश्वनाथ शेटकर, डॉ. रामराव दुडीले, रामचंद्र तिरुके, काशिनाथ गंगापुरे, रंजनाताई कराड, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, उपप्राचार्य प्रा. रमेश गुट्टे यांनी अभिनंदन केले आहे.

पुरोगामी विचाराचे
एकमत

शुक्रवार, दिनांक २६ मे २०२३



# संजीवनी महाविद्यालयाचा बारावीचा ९३ टक्के निकाल

चाकूर : प्रतिनिधी

## ४७ विद्यार्थी विशेष प्रावीण्यात, ५४३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत येथील संजीवनी महाविद्यलाचा ९२.९३ टक्के निकाल लागला आहे.

विज्ञान, कला व वाणिज्य शाखेतून ८७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यातील ८१५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ४७ विद्यार्थी विशेष प्राविण्याने उतीर्ण तर ५४३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २१४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उतीर्ण झाले आहेत.

विज्ञान शाखेचा ९६ टक्के, कला शाखेचा ८६ टक्के तर वाणिज्य शाखेचा ९५.८३ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेत सायली मनोज मुंढे यांनी ८४.८३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. आदित्य प्रकाशराव फड ८३.६६ टक्के मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. रुतुजा कदम या विद्यार्थिनीने ८३ टक्के मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे. वाणिज्य शाखेतून निशा माधव गुंगाळे या विद्यार्थ्यांनि ७६.६६ टक्के मिळवत प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच वेदिका नामदेव चिटलवाड यांनी ७६.१६ टक्के घेत द्वितीय तर प्रतीक्षा कांबळे याने ७६ टक्के मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे. कला शाखेतून शुभांगी व्यंकटी कांबळे या विद्यार्थिनीने ७९.६६ टक्के गुण मिळवत कला शाखेतून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. त्या पाठोपाठ स्वाती उमाकांत हाळनर यांनी ७९ टक्के तर ओम सदानंदे याने ७६ टक्के मिळवत अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला आहे.

बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे, संस्था सचिव तथा चापोलीचे सरपंच उपप्राचार्य डॉ. भालचंद्र नारायणराव चाटे, अध्यक्ष विश्वनाथ शेटकर, उपाध्यक्ष डॉ. रामराव दुडीले, रामचंद्र तीरुके, काशिनाथ गंगापुरे, रंजनाताई कराड, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. रमेश मुंढे सह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

पुण्य नगरी
शुक्रवार, २६ मे २०२३

# चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाचे बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**चापोली :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत चाकूर तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महाविद्यलाचा ९२.९३ टक्के निकाल लागला आहे.

विज्ञान, कला व वाणिज्य शाखेतून ८७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यातील ८१५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ४७ विद्यार्थी विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले आहेत. ५४३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २१४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उतीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेचा निकाल ९६ टक्के, कला शाखेचा ८६ टक्के तर वाणिज्य शाखेचा ९५.८३ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेत सायली मनोज मुंढे हिने ८४.८३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. आदित्य फड याने ८३.६६ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. रुतुजा कदम या विद्यार्थिनीने ८३ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे. वाणिज्य शाखेतून निशा गुंजाळे या विद्यार्थिनीने ७६.६६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला आहे. वेदिका चिटलवाड यांनी ७६.१६ टक्के गुण घेत द्वितीय तर प्रतीक्षा कांबळे हिने ७६ टक्के घेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. कला शाखेतून शुभांगी कांबळे हिने ७९.६६ टक्के घेत कला शाखेतून प्रथम येण्याचा मान मिळवला. स्वाती हाळनर हिने ७९ टक्के तर ओम सदानंदे याने ७६ टक्के गुण मिळवत अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला आहे.

या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे, संस्था सचिव डॉ. भालचंद्र चाटे, अध्यक्ष विश्वनाथ शेटकर, उपाध्यक्ष डॉ. रामराव दुडिले, रामचंद्र तिरुके, काशिनाथ गंगापुरे, रंजना कराड, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकट होनराव, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, उपप्राचार्य प्रा. रमेश गुट्टे यांनी अभिनंदन केले आहे.

रविवार, २१ मे २०२३



चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाची विद्यार्थिनी पूजा बिडगर यांनी पोलिस भरती परीक्षेमध्ये यश संपादन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# संजीवनी महाविद्यालयात पूजा बिडगर यांचा सत्कार

चापोली , पुढारी वृत्तसेवा: येथील संजीवनी महाविद्यालयाची विद्यार्थिनी पूजा तुकाराम बिडगर यांनी नुकतेच पोलीस भरती परीक्षेमध्ये यश संपादन केले. याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

पूजाने महाविद्यालयात शिक्षणाबरोबरच मैदानी खेळात ही अग्रेसर होती. महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्राचा व मार्गदर्शनाचा तिने लाभ घेतला व पहिल्यांच प्रयत्नात यश संपादन केले आहे. सत्कारसमयी तुकाराम निवृत्ती बिडगर, लता तुकाराम बिडगर, ज्ञानेश्वर शिवाजी कांबळे, शिवाजी गुरुनाथ कांबळे, भाऊराव मंजुळराम कांबळे, बसवराज बालाजी कांबळे, राजेश्वर उद्धव कांबळे, पंकज किशन कांबळे आदिंची उपस्थिती होती.

र, शनिवार, २० मे २०२३



चापोली : संजीवनी महाविद्यालयात पूजा बिडगर या विद्याथिनीचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. धनंजय चाटे व इतर.

# पूजा बिडगर यांचा सत्कार

चाकूर : चापोली (ता. चाकूर) येथील संजीवनी महाविद्यालयातील विद्यार्थिनी पूजा तुकाराम बिडगर हिची मुंबई पोलिस भरतीमध्ये निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. महाविद्यालयात प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते हा सत्कार पार पडला. यावेळी वडील तुकाराम बिडगर, लता बिडगर, ज्ञानेश्वर कांबळे, शिवाजी कांबळे, भाऊराव कांबळे, बस्वराज कांबळे, राजेश्वर कांबळे, पंकज कांबळे उपस्थित होते.

शनिवार, २० मे २०२३

# संजीवनी महाविद्यालयात पूजा बिडगर यांचा सत्कार

**चापोली :** चाकूर तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाची विद्यार्थिनी पूजा तुकाराम बिडगर यांनी नुकतेच पोलीस भरती परीक्षेमध्ये यश संपादन केले. त्यानिमिताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांनी पूजा बिडगर यांचा सत्कार केला.



नुकतेच मुंबई पोलीस दलातील शिपाई या पदाची परीक्षा घेण्यात आली होती. त्यात पूजा बिडगर यांनी यश संपादन केले आहे महाविद्यालयाची विद्यार्थी असून महाविद्यालयात शिक्षणाबरोबरच मैदानी खेळात ही अग्रेसर राहत असत. महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्राचा व मार्गदर्शनाचा तिने लाभ घेतला व पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले आहे. या यशाबद्दल संजीवनी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे यांच्या हस्ते पूजा बिडगर यांचा सत्कार करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी वडील तुकाराम निवृत्ती बिडगर, लता तुकाराम बिडगर, ज्ञानेश्वर शिवाजी कांबळे, शिवाजी गुरुनाथ कांबळे, भाऊराव मंजुळराम कांबळे, बसवराज बालाजी कांबळे, राजेश्वर उद्धव कांबळे, पंकज किशन कांबळे आदी उपस्थित होते.

शनिवार, दि. २० मे २०२३



# संजीवनी महाविद्यालयात पूजा बिडगर यांचा सत्कार

चाकूर, दि. १९(सा.वा.) - तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाची विद्यार्थिनी पूजा तुकाराम बिडगर यांनी नुकतेच पोलीस भरती परीक्षेमध्ये यश संपादन केले. या यशाबद्दल संजीवनी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते पूजा बिडगर यांचा सत्कार करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी वडील तुकाराम बिडगर, लता बिडगर, ज्ञानेश्वर कांबळे, शिवाजी कांबळे, भाऊराव कांबळे, बसवराज कांबळे, राजेश्वर कांबळे, पंकज कांबळे हे उपस्थित होते.

पुण्य नगरी

बुधवार, २९ मार्च २०२३

# ग्राहकांनी फसवणुकीपासून सावध राहावे : प्रवीण फुलारी



**चापोली :** ग्राहकांनी जागृत राहून प्रत्येक मालाची खरेदी व्यवस्थित करून त्याची पावती घ्यावी व फसवणुकीपासून सावध रहावे, असे प्रतिपादन अहमदपूरचे उपविभागीय अधिकारी प्रवीण फुलारी यांनी केले.

चापोली येथील संजीवनी महाविद्यालयात तहसील कार्यालय चाकूर यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या जागतिक ग्राहक दिनानिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे, माजी मुख्याध्यापक प्रल्हाद तिवारी, प्रशिक्षणार्थी तहसिलदार निलेश होनमोरे, पुरवठा नायब तहसीलदार बालाजी चितळे, तलाठी संघटनेचे अध्यक्ष अविनाश पवार, चापोली सज्जाचे तलाठी बालाजी हाक्के, अव्वल कारकुन शिवाजी मुळे, महसूल सहाय्यक कासराळीकर, ग्रामपंचायत सदस्य गणेश स्वामी, बसवंत आलमले, चंदर तेलंगे, शकुंतला शेवाळे, सह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रवीण फुलारी यांनी ग्राहक जागृती संदर्भात विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले व सायबर गुन्ह्यापासून सुद्धा सावध राहण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. प्रास्ताविक नायब तहसीलदार बालाजी चितळे यांनी केले.

यावेळी उपस्थितांची भाषणे झाली. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनीं उपस्थित होत्या. सूत्रसंचालन प्रा.संदीप मुंडे यांनी केले.

पुरोगामी विचाराचे
एकमत ७

लातूर, शुक्रवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२३
epaper http://www.dainikekmat.com

# चापोलीतील बोगद्यासाठी जिल्हा प्रशासन सकारात्मक

## संजीवनी महाविद्यालय जवळील बोगद्याची नितांत गरज ■ लवकरच निर्णय होण्याची अपेक्षा

चापोली : वार्ताहर



येथील राष्ट्रीय महामार्ग ३६१ जात आहे परंतु हा संजीवनी महाविद्यालयाजवळ विद्यार्थ्यांना येण्या- जाण्यासाठी एका बोगद्याची आवश्यकता आहे, चापोलीकरांची भावना लक्षात घेऊन चाकूर - अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबासाहेब पाटील यांच्या निदर्शनास ही गोष्ट आल्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बीपी यांच्याशी पत्र व्यवहार केल्यानंतर जिल्हा प्रशासनाने सकारात्मकता दर्शविली आहे.

चाकूर-अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबासाहेब पाटील यांच्या विनंतीला मान देऊन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी .यांनी संजीवनी महाविद्यालयाच्या व अन्य विद्यार्थ्यांसाठी जा येण्यासाठी बोगद्यासाठी पाहणी केली. या पाहणीनंतर या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सुरक्षितेसाठी बोगदा आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांनी या संदर्भात तहसीलदार डॉक्टर शिवानंद बिडवे यांना तहसीलदार गटशिक्षणविकास अधिकारी, व पोलिस निरीक्षक यांचा संयुक्त अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्यांच्या या निर्देशानुसार लवकरच अहवाल सादर केल्यानंतर चापोलीकरांना अजून एका बोगदा मिळेल यात कुठलीही शंका नसल्याचे सर्वसामान्य चापोलीकरातून बोलले जात आहे.

जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. हे चापोली येथे आल्यानंतर त्यांचा संजीवनी महाविद्यालयाच्या वृतीने प्राचार्य डॉ. धनंजय चाटे, सरपंच तथा उपप्राचार्य डॉक्टर भालचंद्र चाटे यांनी सत्कार केला. यावेळी अहमदपूर-चाकूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबासाहेब पाटील, भूसंपादन अधिकारी जीवन देसाई, राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प व्यवस्थापक सुनिल पाटील, उपजिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, तहसीलदार डॉ. शिवानंद बिडवे यांच्यासह विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

पुरोगामी विचाराचे
एकमत

दिनांक २४ जानेवारी २०२३

# युवकांच्या व्यक्तिमत्व विकासात रासेयोचे योगदान : प्राचार्य चाटे

चाकूरः प्रतिनिधी

ग्रामविकास आणि युवकांच्या व्यक्तीमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन संजीवनी महाविद्यालय चापोलीचे प्राचार्य डॉ. धनजय चाटे यांनी अध्यक्षीय समारोपात केले.

विशेष वार्षिक युवक शिबिराचा वाघोली येथे दि. २२ जानेवारी २०२३ रोजी समारोप झाला. या समारोपप्रसंगी संस्थेचे संस्थापक परमपूज्य शिक्षणमहर्षि स्व.नारायणराव चाटे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून मंचावर प्रा. अ.ना. शिंदे (माजी विभागीय समन्वयक लातूर) प्रा. विजय गवळी (जिल्हा समन्वक लातूर) सरपंच कांतराव सोनवणे, उपसरपंच ज्ञानोबा भोसले, माजी पंचायत समिती सभापती व्यंकटराव सोनवणे, पोलिस पाटील रामराव केंद्रे, ज्ञानोबा केंद्रे हे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.धनंजय चाटे यांनी गौरवशाली भारत निर्माण करण्यासाठी युवकांना संधी देऊन ग्रामविकासाची चळवळ राबवली पाहिजे. या सात दिवसात रासेयो स्वयंसेवकांनी श्रमदान, स्वच्छता, शोषखड्डे, वनराई बंधारा, स्मशानभूमीची स्वच्छता आणि भिंतीवरील सुवचने असे उपक्रम राबवून या रासेयो शिबिराचा फायदा गावाला नक्की होईल.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते रासेयो शिबिरात सहभाग नोंदवलेल्या स्वयंसेवकांना प्रमाणपत्र देण्यात आले. सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. खेडकर एन.आर.यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जितेंद्र कांबळे यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. गणेश मदने, प्रा. यु. पी भालेराव ग्रामस्थ, स्वयंसेवक उपस्थित होते.



देशोन्नती

, दि. २४ जानेवारी २०२३

# ग्रामविकासात व युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान-प्राचार्य डॉ. धनंजय चाटे

देशोन्नती वृत्तसंकलन...

चाकूर ■ संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर जि. लातूरचे 'रासेयो' विशेष वार्षिक युवक शिबिराचा वाघोली ता. चाकूर येथे दि. २२ जानेवारी २०२३ रोजी समारोप झाला. या समारोपप्रसंगी संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी स्व. नारायणराव चाटे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . यानंतर मान्यवरांचे स्वागत स्वागतगीताने करून सत्कार करण्यात आला.

या शिबिराच्या कार्यक्रम समारोप अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. धनंजय चाटे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अ.ना. शिंदे, माजी विभागीय समन्वयक लातूर, प्रा. विजय गवळी, जिल्हा समन्वयक, लातूर, वाघोली गावचे सरपंच कांतराव सोनवणे, उपसरपंच ज्ञानोबा भोसले, माजी पंचायत समिती सभापती व्यंकटराव सोनवणे, पोलीस पाटील रामराव केंद्रे, ज्ञानोबा केंद्रे आणि गावातील प्रतिष्ठित व्यक्ती मंचावर उपस्थित होते.

या अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांनी, ग्रामीण भागाच्या विकासासाठी रासेयो युवकांचे योगदान फार महत्त्वाचे आहे. आजचा युवक उद्याच्या



भारताचे भविष्य घडवणार आहे. गौरवशाली भारत निर्माण करण्यासाठी नवयुगांना संधी देऊन ग्रामविकासाची चळवळ राबवली पाहिजे. या सात दिवसात रासेयो स्वयंसेवकांनी श्रमदान, स्वच्छता, शोषखड्डे, वनराई बंधारा, स्मशानभूमीची स्वच्छता आणि भिंतीवरील सुवचने असे उपक्रम राबवून या रासेयो शिबिराचा फायदा गावाला नक्की होईल. त्याचबरोबर या शिबिरातील स्वयंसेवकाचा शारीरिक, बौद्धिक, मानसिक विकासही होईल. तसा वाघोली गावाला राजकीय वारसा चांगला असून आदर्श गाव बनविण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन योगदान दिले पाहिजे. रासेयोच्या विद्यार्थ्यांनी सात दिवसात गावाला दिलेला संदेश आमलात आणून ग्रामविकास चळवळ गतिमान करावी आणि हा संदेश वाघोली येथील ग्रामस्थ नक्कीच त्याचा विचार करतील. विद्यार्थ्यांनी सात दिवसात राबवलेले उपक्रम कौतुकास्पद आहेत, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी केले.

अध्यक्षीय समारोपानंतर व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते रासेयो शिबिरात सहभाग नोंदवलेल्या स्वयंसेवकांना संजीवनी महाविद्यालयाच्या वतीने प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. खेडकर एन. आर. यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जितेंद्र कांबळे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. गणेश मदने, प्रा. यु. पी. भालेराव तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुणवर्ग, स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरोगामी विचाराचे
एकमत

दिनांक २३ जानेवारी २०२३

# पुरोगामी विचाराची राज्याला नितांत गरज : बावगे

**चाकूर** पुरोगामी विचारांची आज महाराष्ट्राला गरज असल्याचे प्रतिपादन अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे माधव बावगे यांनी केले. संजीवनी महाविद्यालय चापोलीचे वाघोली येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक युवक शिबिरात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वाघोली गावचे सरपंच कांतराव सोनवणे तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस पाटील केंद्रे रामराव उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना माधव बावगे म्हणाले की, बुवाबाजी देवाधिकांच्या नावे चालू असलेली अंधश्रद्धा नष्ट करणे तरुणांच्या हातात आहे. सूत्रसंचालन प्रा.जितेंद्र कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.मदने जी.टी.यांनी केले.

शनिवार, दिनांक २१ जानेवारी २०२३

पुरोगामी विचाराचे
एकमत

# तरुणांनी ग्रामविकासात योगदान द्यावे : डॉ.चाटे

**चाकूर : प्रतिनिधी**

तरुणांनी ग्रामविकासात योगदान द्यावे, असे आवाहन नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळाचे सचीव डॉ. भालचंद्र चाटे यांनी केले. संजीवनी महाविद्यालय चापोलीचे रा.से.यो. विशेष युवक शिबिराचे वाघोली येथे होत आहे. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

संजीवनी महाविद्यालय चापोलीच्या वतीने चाकूर तालुक्यातील वाघोली येथे दि १६ ते २२ जानेवारी २०२३ या कालावधीत विशेष युवक शिबिर आयोजित करण्यात आले आहे. दि १६ जानेवारी रोजी सायंकाळी साडेचार वाजता वाघोलीचे सरपंच कांतराव सोनवणे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

डॉ.भालचंद्र चाटे यांनी गावाच्या विकासात रासेयोचे मोठे योगदान आहे. तसेच पंचायत समिती चाकूरचे माजी सभापती व्यंकटराव सोनवणे रासेयो शिबीराचा लाभ गावांनी घ्यावा, असे आवाहन केले. संतोष भोसले यांनी रासेयोचे महत्त्व सांगितले. यावेळी उपसरपंच ज्ञानोबा भोसले,केंद्रे रामराव, केंद्रे रामराव,सोनवणे व्यंकट,पटणे,केंद्रे तुकाराम, विलास भोसले,रतन वाघमारे, गुरमे उत्तम सोनवणे, विश्वभंर केंद्रे हे उपस्थित होते.

या शिबिरात ग्रामस्थांनी सहभागी व्हावी असे आवाहन कार्यक्रमाधिकारी प्रा. खेडकर एन. आर.,प्रा. जे. टी. कांबळे, प्रा.मदने जी.टी.यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. जे. टी. कांबळे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. खेडकर एन. आर. यांनी केले आभार प्रदर्शन प्रा.मदने जी.टी.यांनी केले. यावेळी गावातील बहुसंख्य ग्रामस्थ, स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.



लातूर, बुधवार, दि. १८ जानेवारी २०२३ ५

देशोन्नती

# संजीवनी महाविद्यालय चापोलीचे रा.से.यो. विशेष युवक शिबिराचे वाघोली येथे उद्घाटन संपन्न

**चापोली** ■ संजीवनी महाविद्यालय चापोलीच्या वतीने चाकूर तालुक्यातील वाघोली येथे दिनांक १६ ते २२ जानेवारी २०२३ या कालावधीत विशेष युवक शिबिर आयोजित करण्यात आले आहे. दिनांक १६ जानेवारी रोजी सायंकाळी साडेचार वाजता वाघोलीचे सरपंच मा. कांतराव सोनवणे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नवयुग शिक्षण प्रसारक मंडळ चापोलीचे सचिव, उपप्राचार्य डॉ.भालचंद्र चाटे यांनी गावाच्या विकासात रासेयोचे मोठे योगदान आहे. तसेच पंचायत समिती चाकूर चे माजी सभापती मा. व्यंकटराव सोनवणे रासेयो शिबीराचा लाभ गावांनी घ्यावा .संतोष भोसले यांनी रासेयोचे महत्त्व सांगून गावाचे विकासासाठी असे उपक्रम उपयुक्त आहे. त्यासाठी गावकऱ्यांचे सहकार्य करण्यात येईल. असे आश्वासन देण्यात आले यावेळी उपसरपंच ज्ञानोबा भोसले,केंद्रे रामराव, केंद्रे रामराव,सोनवणे व्यंकट,पटणे सर,केंद्रे तुकाराम, विलास भोसले,रतन वाघमारे, गुरमे सर उत्तम सोनवणे,विश्वभंर केंद्रे उपस्थित होते.या सात दिवसात ग्रामस्थांनी सहभागी व्हावी असे कार्यक्रमाधिकारी प्रा. खेडकर एन.आर.,प्रा. जे. टी. कांबळे, प्रा.मदने जी.टी.यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. जे.टी. कांबळे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. खेडकर एन.आर. यांनी केले आभार प्रदर्शन प्रा.मदने जी.टी.यांनी केले .यावेळी गावातील बहुसंख्य ग्रामस्थ, स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.



CMYK

देशोन्नती

लातूर, शनिवार, दि. २१ जानेवारी २०२३

# पुरोगामी विचारांची आज महाराष्ट्राला गरज-माधव बावगे

देशोन्नती वृत्तसंकलन...

चापोली - संजीवनी महाविद्यालय चापोलीचे वाघोली ता. चाकूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक युवक शिबिर दि. १६ जानेवारी ते २२ जानेवारी २०२३ या कालावधीत होत आहे.

शिबिरांच्या तिसऱ्या दिवसाच्या सायंकाळच्या सत्रात दि. १८ जानेवारी रोजी माधव बावगे, सामाजिक कार्यकर्ते, लातूर यांचे 'अंधश्रद्धा निर्मूलन प्रयोग' सादर करण्यात आले. प्रथम महात्मा गांधी व परमपुज्य, शिक्षणमहर्षी स्व. नारायणराव चाटे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंतर माधव बावगे यांचे स्वागत सोनवणे ऋत्विक यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वाघोली गावचे सरपंच कांतराव सोनवणे तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस पाटील केंद्रे रामराव उपस्थित होते.

यावेळी जनसमुदायला संबोधित करताना बावगे म्हणाले की, बुवाबाजी देवाधिकांच्या नावे चालू असलेली अंधश्रद्धा नष्ट करणे तरुणांच्या हातात आहे. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ ही वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांडांचे संस्कार समाजातील विकृती आहे. सत्याचा शोध घेणारी व्यवस्था निर्माण करणे आजच्या तरुणांच्या हातात आहे. करणी, भूत, भानामती अंगात येणे या निव्वळ अंधश्रद्धा आहेत. समाज जागृत होणे काळाची गरज आहे. हे सांगून विविध प्रयोग सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जितेंद्र कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मदने जी. टी. यांनी केले. यावेळी बहुसंख्य गावकरी, महिला उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील तरुणांनी विशेष सहकार्य केले.



लातूर, शनिवार, दिनांक ३१ डिसेंबर २०२२
पुरोगामी विचारांचे एकमत

# 'संजीवनी'च्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**चाकूर :** चाकूर तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाचा इयत्ता १२ वी विज्ञान शाखेत शिकणारा विद्यार्थी रोहित संजीव तपघाले याची १९ वर्ष वयोगटात राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. याबद्दल त्याचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. रोहित संजीव तपघाले यांनी क्रीडा संकुल लातूर येथे नुकत्याच पार पडलेल्या विभागीय तायक्वांदो व किक बॉक्सिग या क्रीडा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी बजावली. रोहित तपघाले विभागातील सर्व प्रतस्पिर्धांना पराजित करून विभागातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला व राज्यस्तरीय तायक्वांदो व किक बॉक्सिंगसाठी पात्र ठरला आहे. रोहित तपघाले यांना प्रा. गोविंद फड, प्रा. डॉ. नारायण जायभाये यांचे मार्गदर्शन लाभले आहे. रोहित तपघाले याच्या नेत्रदीपक कामगिरीबद्दल संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे यांनी महाविद्यालयात सत्कार केला. रोहीतच्या या कामगीरी बद्दल अध्यक्ष विश्वनाथराव शेटकर,उपाध्यक्ष रामराव दुडिले,संस्था सचिव तथा चापोलीचे लोकनियुक्त सरपंच तथा उपप्राचार्य डॉ. भालचंद्र नारायणराव चाटे,बब्रुवान आवस्कर,मल्लीकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, काशीनाथ गंगापुरे, रामचंद्र तिरुके, रंजनाताई कराड, भगवानराव सोमवंशी संजीवनी महावद्यिालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे कनिष्ठ महावद्यिालयाचे उपप्राचार्य रमेश गुट्टे, प्रा. माधव कागणे, प्रा. मनोज मुंढे, प्रा. अण्णाराव केंद्रे, प्रा. बजरंग केंद्रे आदी उपस्थित होते.

लातूर Next
पुरोगामी विचाराचे एकमत
लातूर, सोमवार, दिनांक ५ डिसेंबर २०२२

महत्त्वाचे



## विद्यापीठ अधिसभा निवडणुकीत प्रा. डॉ. मुंढे विजयी

**चाकूर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अधिसभा २०२२ एन.टी. प्रवर्गातून अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघाचे अधिकृत उमेदवार व पॅनल प्रमुख प्रा. डॉ.संतराम मुंडे यांचा विद्यापीठ निवडणुकीत सर्वाधिक मतांनी विजय झाला. या विजयानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.धनंजय चाटे, प्राचार्य सिनेट सदस्य डॉ.दीपक बच्चेवार डॉ.वसंतराव भोसले सिनेट सदस्य युवराज पाटील व संजीवनी महाविद्यालयातील त्यांच्या सहकाऱ्यानी डॉ.संतराम मुंडे यांचा यथोचित सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.प्रा. डॉ. संतराम मुंडे हे गेल्या १८ वर्षापासून चाकूर तालुक्यातील संजीवनी महाविद्यालय चापोली येथे लोकप्रशासन विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असून त्यांनी यापूर्वी विद्यापीठ पातळीवर विविध समितींमध्ये काम करीत असताना प्राध्यापकांची प्रश्न समजून त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीच्या उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे.

सकाळ TODAY



चापोली (ता. चाकूर) : संजिवनी महाविद्यालयातील प्रा. डॉ. संतराम मुंडे हे अधिसभा निवडणुकीत व प्रा. डॉ. विजयकुमार ढोले आभ्यास मंडळाच्या निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्य डॉ. धनंजय चाटे व प्राध्यापक.

## विद्यापीठ अधिसभेवर प्रा. संतराम मुंडे विजयी

चाकूर: स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत एन. टी. प्रवर्गातून अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघाचे उमेदवार प्रा. डॉ. संतराम मुंडे विजयी झाले आहेत. संजिवनी महाविद्यालयात लोकप्रशासन विभागाचे प्रमुख म्हणून मागील १८ वर्षापासून कार्यरत असलेले डॉ. मुंडे यांनी विद्यापीठ पातळीवर विविध समितीमध्ये काम करत असताना प्राध्यापकांच्या प्रश्नांची सोडवणूक केले आहे. यामुळे त्यांना अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या प्रदेश कार्यकारणीच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. नुकत्याच झालेल्या विद्यापीठाच्या निवडणुकीत त्यांनी भरघोस मतांनी विजय मिळवीला. तसेच मराठी आभ्यास मंडळाच्या निवडणुकीत डॉ. प्रा. विजयकुमार ढोले हे विजयी झाले आहेत.

देशोन्नती माझं शहर

# 'संजीवनी'ची विद्यार्थिनी रेणुकाची दुय्यम निरीक्षकपदी निवड

देशोन्नती वृत्तसंकलन...

चापोली ■ संजीवनी महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी रेणुका सलगर यांनी जिद्दीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे भटक्या जमाती प्रवर्गातून राज्यात प्रथम येण्याचा बहुमान त्यांनी मिळवला आहे. या नेत्रदीपक कामगिरीबद्धल संजीवनी महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला.

रेणुका सलगर या जेमेतेम शंभर कुटुंब संख्या असलेल्या मष्णेरवाडी येथील रहिवाशी आहेत. शालेय शिक्षण गावातच घेतल्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षण त्यांनी चापोली येथील संजीवनी महाविद्यालयात घेतले. पुढे पदवीचे शिक्षण त्यांनी संजीवनी महाविद्यालयातच पूर्ण केले. अत्यंत शांत व अभ्यासू विद्यार्थिनी म्हणून त्यांची महाविद्यालयात ओळख आहे. पदवीचे शिक्षण घेत असतानाच रेणुका यांना महाविद्यालयातील ग्रंथालयातील पुस्तके वाचनाची आवड निर्माण झाली. तसेच महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचाही फायदा झाला. संजीवनी



महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी व रेणुका सलगर यांचा मोठा भाऊ हा सध्या नागपूर येथे पोलीस निरीक्षक म्हणून कर्तव्य बजावत आहे. मोठ्या भावाच्या मार्गदर्शनाखाली रेणुका यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरु केली. लातूर राहून रेणुका यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्यास सुरुवात केली. दरम्यान तीन वेळा अपयश आले तरी त्या खचून न जाता जिद्दीने आपले प्रयत्न सुरूच ठेवले. चौथ्या प्रयत्नात त्यांनी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत राज्यकर निरीक्षक या पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत राज्यातून ३०० वा क्रमांक मिळवला तर दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क पदाच्या परीक्षेत राज्यातून ५४ वा तर भटक्या जमाती प्रवर्गातून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. संजीवनी महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी रेणुका सलगर यांच्या नेत्रदीपक कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांनी महाविद्यालयात आई वडील व त्यांचा सत्कार केला. यावेळी संस्था सचिव उपप्राचार्य डॉ. भालचंद्र चाटे, प्रा. श्रीहरी वेदपाठक, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य रमेश गुट्टे, प्रा. संदीप मुंढे, प्रा. डॉ. माधव कागणेसह विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

### शेळीपालन करून मुले घडवली

गोविंद सलगर व शोभा सलगर या दाम्पत्याला मष्णेरवाडी येथे फक्त चार एकर खडकाळ जमीन आहे. म्हणावे तसे त्यात पिकत ही नाही. त्यातच शेळीपाल करून सलगर दांपत्य आपला संसार चालवत आहेत. मोठा मुलगा आज नागपूर येथे पोलीस निरीक्षक म्हणून कर्तव्य बजावत आहे तर रेणुका यांनीही आपल्या वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत दुय्यम निरीक्षपदी निवड झाली. तसेच लहान भाऊ कृष्णा सध्या शिक्षण घेत आहे. परिस्थितीतीचा कसलाही शोक व्यक्त न करता जिद्दीने माझ्या लेकरांनी यश मिळवणे याचा आम्हाला आनंद आहे अशा भावना यावेळी सलगर दाम्पत्याने व्यक्त केल्या. महाविद्यालयाकडून मोफत बस असल्याने मला शिक्षणासाठी कसलीही अडचण आली नाही. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांनी पदवीचे शिक्षण घेत असताना मला वेळोवेळी मार्गदर्शन केले. ज्या महाविद्यालयात मी माझे शिक्षण पूर्ण केले त्याच गुरूंच्या हस्ते माझा भव्य सत्कार झाला या पेक्षा मोठा आनंद असूच शकत नाही. विद्यार्थ्यांनी पदवीचे शिक्षण घेतानाच वाचनाची आवड निर्माण करून जिद्दीने अभ्यास केला तर नक्कीच तुम्हीपण यशस्वी होऊ शकता, असे रेणुकाने सांगितले.

देशोन्नती

लातूर, सोमवार, दि. २८ नोव्हेंबर २०२२

# तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत वीर हनुमान विद्यालयाचे घवघवीत यश

देशोन्नती वृत्तसंकलन...

**चापोली** ■ जिल्हा परिषद प्रशाला, नळेगावच्या मैदानावर झालेल्या स्पर्धेत वीर हनुमान विद्यालयाने यश संपादित केले चाकूर तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा जिल्हा परीषद प्रशाला, नळेगाव या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धेचे उद्घाटन पोलिस उपाधीक्षक निकेतन कदम यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष नितीन माशाळकर, (मुख्याध्यापक, प्रशाला, नळेगाव प्राचार्य डॉ. संजय वाघमारे यांची उपस्थिती होती. या स्पर्धेत नवयुवक शिक्षण



प्रसारक मंडळ चापोली व्दारा संचलित वीर हनुमान विद्यालय, हिंपळनेरचा संघ व्दितीय आला. संघातील सहभागी विद्यार्थी येंचलवाड महेश दत्ता, राजूरे गहिनीनाथ बालाजी, मुंढे सुशांत उद्धव, मुरकुटे ऋषिकेश बळीराम, मुरकुटे प्रथमेश अर्जुन व मुरकुटे आदिनाथ वसंत यांचे नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. चाटे भालचंद्र नारायणराव, संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चाटे धनंजय नारायणराव, मुख्याध्यापक बालवाड संजय व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

सकाळ | लातूर औरंगाबाद, सोमवार, २१ नोव्हेंबर २०२२

# मष्णेरवाडीच्या रेणुकाची दुय्यम निरीक्षकपदी निवड

## आईचा शेळी पालनाचा व्यवसाय : जिद्दीने मिळवले यश

प्रशांत शेटे : सकाळ वृत्तसेवा

चाकूर, ता. २० : वडील मजुरी करतात, आई शेळ्या राखून उदरनिर्वाह भागविणाऱ्या कुटुंबाने मुलीला शिक्षणासाठी प्रोत्साहन दिल्यामुळे मष्णेरवाडी (ता. चाकूर) या छोट्याशा गावातील रेणुका गोविंद सलगर ही मुलगी राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत भटक्या जमाती प्रवर्गातून राज्यात प्रथम आली आहे. यामुळे तिची राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दुय्यम निरीक्षकपदी झाली आहे.

मष्णेरवाडी शंभर लोकवस्तीचे गाव असून खडकाळ जमिनीमुळे मोलमजुरी व शेळी पालन हा येथील कुटुंबीयांचा व्यवसाय आहे. गावातील गोविंद सलगर यांना दोन मुली व एक मुलगा असून त्यांनी चांगले शिक्षण घेऊन नोकरी करावी अशी पालकांची इच्छा होती. यासाठी आई - वडिलांनी दिवसरात्र मेहनत करून मुलांचे शिक्षण पूर्ण केले. रेणुका हिचे प्राथमिकचे शिक्षण गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले यानंतर माध्यमिक शिक्षण अजनसोंडा येथे पूर्ण करून विज्ञान विषयात पदवीचे शिक्षण चापोली येथील संजिवनी महाविद्यालयात घेतले. पदवी झाल्यानंतर नागपूर येथे पोलिस उपनिरीक्षक असलेला चुलत भाऊ शिरीष सलगर यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याचा सल्ला रेणुकाला दिला. अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगून रेणुकाने लातूर येथे स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाला सुरवात केली. पहिल्या दोन परीक्षेत थोड्या कमी गुणामुळे यश मिळाले नाही यामुळे पुन्हा प्रयत्न करून रेणुकाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत बाजी मारली.

नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात तीचा ५४ वा क्रमांक असून भटक्या जमाती प्रवर्गातून मुलींमध्ये राज्यातून प्रथम येण्याचा मान तीने मिळविला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागात दुय्यम निरीक्षक पदावर तिची नियुक्ती होऊ शकते. याबद्दल तिचे शिक्षक प्रा. श्रीहरी वेदपाठक, शुभांगी वेदपाठक, सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले, डॉ. मकरंद गिरी यांनी तीचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



चाकूर : रेणुका सलगर हिची राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दुय्यम निरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले, प्रा. श्रीहरी वेदपाठक, डॉ. मकरंद गिरी आदी.

लातूर Next
पुरोगामी विचाराचे एकमत
लातूर, बुधवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२२




# संजीवनी महाविद्यालयात महाडीबीटी नोंदणी कार्यशाळा

**चाकूर :** सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय लातूर व संजीवनी महाविद्यालय चापोली यांच्या संयुक्त विद्यमाने महाडीबीटीच्या नोंदणी करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीवर चर्चा करून मार्गदर्शन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. धनंजय चाटे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव डॉ. भालचंद्र चाटे हे उपस्थित होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका समन्वयक श्रीराम शिंदे, नागेश जाधव व मनोज मोरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शिक्षणमहर्षि स्व. डॉ. नारायणराव चाटे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. समन्वय श्रीराम शिंदे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल नंबर आधारशी सलग्न करून घ्यावा. आपले आधार कार्ड बँकेशी सलग्न असायला हवे. त्याशिवाय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत नाही. मनोज मोरे यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरतेवेळी ज्या तांत्रिक अडचणी येतात त्याचे निरसन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिष्यवृत्ती विभाग प्रमुख मनोज दुडीले, प्रा. नारायण निलापल्ले, प्रा. अशोक गुरमे, प्रा. नारायण खेडकर, प्रा. सी. आर. कदम, संतोष जेणेकर, लक्ष्मण कोलेवाड, विठ्ठल अलगुले यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. नारायण निलापल्ले यांनी केले तर प्रास्ताविक नागेश जाधव यांनी केले तर आभार शिष्यवृत्ती विभाग प्रमुख मनोज दुडीले यांनी केले.

बुधवार, १९ ऑक्टोबर २०२२

पुण्य नगरी

# संजीवनी महाविद्यालयात महाडीबीटी नोंदणी कार्यशाळा



चापोली : सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय लातूर व संजीवनी महाविद्यालय चापोली यांच्या संयुक्त विद्यमाने महाडीबीटीच्या नोंदणी करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीवर चर्चा करून मार्गदर्शन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. धनंजय चाटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव डॉ. भालचंद्र चाटे, तालुका समन्वयक श्रीराम शिंदे, नागेश जाधव व मनोज मोरे आदी उपस्थित होते. प्रारंभी शिक्षण महर्षी स्व. डॉ. नारायणराव चाटे यांच्या प्रतिमेचे पूजन करून उद्घाटन करण्यात आले. समन्वय श्रीराम शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल नंबर आधारशी संलग्न करून घ्यावा. आपले आधार कार्ड बँकेशी संलग्न असायला हवे. त्याशिवाय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत नाही. विद्यार्थी आपली नोंदणी करतेवेळेस आपला मोबाईल नंबर देतात. त्यावर एक ओटीपी येतो व तुमचे महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी झाली असे समजावे. प्रथम नोंदणी झाल्यानंतर आपला तोच मोबाईल नंबर शेवटपर्यंत शिष्यवृत्तीचा लाभ मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी गरजेचा असतो. तरी विद्यार्थ्यांनी आपल नोंदणी केलेला मोबाईल नंबर जतन करणे गरजेचे आहे. तसेच शिष्यवृत्तीसाठी लागणारे कागदपत्र व विद्यार्थ्यांना कोणकोणत्या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल या विषयी मार्गदर्शन केले. तसेच मनोज मोरे यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरतेवेळी ज्या तांत्रिक अडचणी येतात याचे निरासन केले. यशस्वितेसाठी शिष्यवृत्ती विभाग प्रमुख मनोज दुडीले, प्रा. नारायण निलापल्ले, प्रा. अशोक गुरमे, प्रा. नारायण खेडकर, प्रा. सी. आर. कदम, संतोष जेणेकर, लक्ष्मण कोलेवाड, विठ्ठल अलगुले सह आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक नागेश जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नारायण निलापल्ले यांनी केले.

पुरोगामी विचाराचे एकमत
लातूर, सोमवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२२
७
epaper
http://www.dainikekmat.com

▶१३ वर्षापासून वर्चस्व ▶ मुले व मुलींच्या कबड्डीच्या स्पर्धा

# 'ब' विभागीय कबड्डी स्पर्धेत संजीवनी महाविद्यालयाचा संघ प्रथम

चाकूर : प्रतिनिधी

'ब' विभागीय कबड्डी स्पर्धेत अंतिम सामन्यात येथील संजीवनी महाविद्यालयाच्या संघाने महात्मा गांधी महाविद्यालयच्या संघाचा पराभव करीत प्रथम क्रमांक मिळवला आहे. सलग १३ वर्षापासून या संघाने प्रथम क्रमांक मिळवत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

स्वामी राममंद तीर्थ विद्यापीठ नांदेड व कोटग्याळ जिल्हा नांदेड येथील वसंत नगर ग्रामीण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. १३ मुले व मुलींच्या कबड्डीच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. मुलाच्या नऊ संघाने सहभाग घेतला होता.

त्यात चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाच्या संघाने प्रथम उदगीर येथील शिवाजी महाविद्यालयाचा संघावर २२ गुणांनी विजय मिळवला. दुसरा सामना उदगीर येथील मात्रभूमी महाविद्यालयाचा १२ गुणांनी पराभव केला. अंतिम सामन्यात अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालयास १७ गुणांनी पराभूत करीत आपले वर्चस्व सिद्ध केले.



या संघात अक्षय पाटील, मारोती राठोड, दिनेश सारूडकर, प्रसाद रुद्राक्ष, अमोल राठोड, सुरज पाटील, आदेश पाईकराव, महेश डुकरे, राम जाधव, गालिब शेख, बालाजी मोरे, जाधव आकाश या खेळाडूंचा सहभाग होता. संघाचे प्रशिक्षक म्हणून प्रा. गोविंद फड व प्रा. डॉ. नारायण जायभाये यांनी काम पाहिले.

यशस्वी खेळाडू व प्रशिक्षकांचा प्राचार्य डॉ. धनंजय चाटे व संस्था सचिव डॉ. भालचंद्र चाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य प्रा. रमेश गुट्टे, मुख्याध्यापक दिलीप चिमेगावे, मुख्याध्यापक संभाजी कोले, ज्ञानेश्वर पांचाळ आदी उपस्थित होते. यशस्वी संघाचे महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

रविवार, १६ ऑक्टोबर २०२२

पुण्य नगरी

# विभागीय कबड्डी स्पर्धेत 'संजीवनी' चा संघ प्रथम



**चापोली :** 'ब' विभागीय कबड्डी स्पर्धेत अंतिम सामन्यात येथील संजीवनी महाविद्यालयाच्या संघाने महात्मा गांधी महाविद्यालयच्या संघाचा पराभव करीत प्रथम क्रमांक मिळवला आहे. सलग १३ वर्षापासून या संघाने प्रथम क्रमांक मिळवत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

स्वामी राममंद तीर्थ विद्यापीठ नांदेड व कोटग्याळ जिल्हा नांदेड येथील वसंत नगर ग्रामीण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. १३ रोजी मुले व मुलींच्या कबड्डीच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. मुलाच्या नऊ संघाने सहभाग घेतला होता. त्यात चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाच्या संघाने प्रथम उदगीर येथील शिवाजी महाविद्यालयाचा संघावर २२ गुणांनी विजय मिळवला. दुसरा सामना उदगीर येथील मातृभूमी महाविद्यालयाचा १२ गुणांनी पराभव केला. अंतिम सामन्यात अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालयास १७ गुणांनी पराभूत करीत आपले वर्चस्व सिद्ध केले. या संघात अक्षय पाटील, मारोती राठोड, दिनेश सारूडकर, प्रसाद रुद्राक्ष, अमोल राठोड, सुरज पाटील, आदेश पाईकराव, महेश डुकरे, राम जाधव, गालिब शेख, बालाजी मोरे, जाधव आकाश या खेळाडूंचा सहभाग होता. संघाचे प्रशिक्षक म्हणून प्रा. गोविंद फड व प्रा. डॉ. नारायण जायभाये यांनी काम पाहिले. यशस्वी खेळाडू व प्रशिक्षकांचा प्राचार्य डॉ. धनंजय चाटे व संस्था सचिव डॉ. भालचंद्र चाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपप्राचार्य प्रा. रमेश गुट्टे, मुख्याध्यापक दिलीप चिमेगावे, संभाजी कोले, ज्ञानेश्वर पांचाळ उपस्थित होते. यशस्वी संघाचे प्राध्यापक, शिक्षक आदींनी अभिनंदन केले.

लातूर Live देशोन्नती
रविवार, दि. १६ ऑक्टोबर २०२२ https://www.deshonnati.com

# 'ब' विभागीय कबड्डी स्पर्धेत 'संजीवनी'चा संघ प्रथम

देशोन्नती वृत्तसंकलन...

**चापोली** - 'ब' विभागीय कबड्डी स्पर्धेत अंतिम सामन्यात येथील संजीवनी महाविद्यालयाच्या संघाने महात्मा गांधी महाविद्यालयच्या संघाचा पराभव करीत प्रथम क्रमांक मिळवला आहे. सलग १३ वर्षापासून या संघाने प्रथम क्रमांक मिळवत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.



स्वामी राममंद तीर्थ विद्यापीठ नांदेड व कोटग्याळ जिल्हा नांदेड येथील वसंत नगर ग्रामीण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. १३ मुले व मुलींच्या कबड्डीच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. मुलाच्या नऊ संघाने सहभाग घेतला होता. त्यात चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाच्या संघाने प्रथम उदगीर येथील शिवाजी महाविद्यालयाच्या संघावर २२ गुणांनी विजय मिळवला. दुसरा सामना उदगीर येथील मात्रभूमी महाविद्यालयाचा १२ गुणांनी पराभव केला. अंतिम सामन्यात अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालयास १७ गुणांनी पराभूत करीत आपले वर्चस्व सिद्ध केले.

या संघात अक्षय पाटील, मारोती राठोड, दिनेश सारूडकर, प्रसाद रुद्राक्ष, अमोल राठोड, सुरज पाटील, आदेश पाईकराव, महेश डुकरे, राम जाधव, गालिब शेख, बालाजी मोरे, जाधव आकाश या खेळाडूंचा सहभाग होता. संघाचे प्रशिक्षक म्हणून प्रा. गोविंद फड व प्रा. डॉ. नारायण जायभाये यांनी काम पाहिले.

यशस्वी खेळाडू व प्रशिक्षकांचा महाविद्यालयात प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे व संस्था सचिव डॉ. भालचंद्र नारायणराव चाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. रमेश गुट्टे, संजीवनी विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप चिमेगावे, मुख्याधापक संभाजी कोले, ज्ञानेश्वर पांचाळ आदी उपस्थित होते. यशस्वी संघाचे महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

सकाळ TODAY

औरंगाबाद, रविवार, ९ ऑक्टोबर २०२२ ३



चापोली (ता. चाकूर) : विद्यापीठाच्या खो - खो स्पर्धेत संजीवनी महाविद्यालयाचा संघ प्रथम आला आहे.

# विभागीय खो-खो स्पर्धेत संजीवनी महाविद्यालय प्रथम

चाकूर, ता. ८ (बातमीदार) : स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ अंतर्गत 'ब' विभागीय आंतरमहाविद्यालयीन खो-खो (मुले) क्रीडा स्पर्धेत चापोली (ता. चाकूर) येथील संजीवनी महाविद्यालय प्रथम आले आहे.

विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धा संजीवनी महाविद्यालयात आयोजीत करण्यात आल्या होत्या प्राचार्य डॉ. धनंजय चाटे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर क्रीडा शिक्षक सुनील डावरे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे सचिव डॉ. भालचंद्र चाटे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष सुरेश शेवाळे, प्रा. रमेश गुट्टे, प्रा. डॉ. तात्याराव केंद्रे, प्रा. डॉ. जयदीप कहाळेकर, डॉ. सचिन चामले, प्रा. सतीश मुंढे यांची उपस्थिती होती.

स्पर्धेत पाच संघांनी सहभाग नोंदविला होत, यात संजीवनी महाविद्यालयाच्या संघाने पहिल्या फेरीत जळकोट येथील संभाजी महाविद्यालयाचा पराभव केला. दुसऱ्या फेरीत उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचा पराभव केला व 'ब'विभागात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला.

संजीवनी महाविद्यालयाच्या संघात पंकज भालेराव, करण मुरकुटे, शैलेश होनराव, ओम जगदाळे, ऋषिकेश गुळवे, मोहम्मद शेख, साहिल शिंदे, गजानन मुर्गे, मंगेश स्वामी, वैभव कांबळे, निखील कुसळे, स्वप्नील गोरे या खेळाडूंनी यशस्वी कामगिरी केली. या संघास प्रा. गोविंद फड, प्रा. डॉ. नारायण जायभाये यांनी मार्गदर्शन केले. पंच म्हणून सुनील डावरे, संतोष कोले, मनोज शिंदे, विश्वनाथ शिंदे यांनी काम पाहिले. विजेत्या संघास सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# ब विभागीय खो-खो स्पर्धेत 'संजीवनी' चे यश

**चाकूर :** नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ अंतर्गत ब' विभागीय आंतरमहाविद्यालयीन खो-खो (मुले) क्रीडा स्पर्धेचे आयोजन चापोली येथील संजीवनी महाविद्यालयात करण्यात आले होते. यात संजीवनी महाविद्यालयाने नेत्रदीपक कामगिरी करीत प्रथम येण्याचा बहुमान मिळविला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. धनंजय चाटे हे उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन माजी क्रीडा शिक्षक सुनील डावरे यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव डॉ. भालचंद्र चाटे, मनसे तालुकाध्यक्ष सुरेश शेवाळे, प्रा. रमेश गुट्टे, प्रा. डॉ. तात्याराव केंद्रे, प्रा. डॉ. जयदीप कहाळेकर, डॉ. सचिन चामले, प्रा. सतीश मुंढे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत पाच संघांनी सहभाग नोंदवला. यात संजीवनी महाविद्यालयाच्या संघाने संभाजी महाविद्यालयाचा एक डाव राखून पराभव केला. तसेच दुस्या फेरीत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय संघाचा एक डाव राखून पराभव केला व ब' विभागात प्रथम येण्याचा बहुमान मिळविला.

> ● शिक्षण महर्षी स्व. डॉ. नारायणराव चाटे यांनी आपल्या पूर्ण कार्यकाळात विद्यालयाच्या स्वच्छतेसाठी जे परिश्रम घेतले त्यामुळे आज संजीवनी संकुल स्वच्छ परिसर म्हणून ओळखला जातो. प्राचार्य डॉ. धनंजय चाटे हे स्व. डॉ. नारायणराव चाटे यांनी दिलेले स्वच्छतेची परंपरा पुढे चालवत आहेत. यातूनच आज संजीवनी कनिष्ठ विद्यालयास स्वच्छतेचा जिल्हास्तरीय पुरस्कार मिळाला आहे.

युवा छत्रपती
E-Mail : yuvachhatrapati@gmail.com मो ९८२३४०१४४४, ८६६८७८४६१६
लातूर, उस्मानाबाद, नांदेड, बीड, परभणी, हिंगोली, औरंगाबाद व सोलापूर येथून एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

# संजीवनी महाविद्यालयास जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार



चाकूर - स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय अभियान अंतर्गत भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडून जिल्ह्यात स्वच्छ विद्यालयाची स्पर्धा घेण्यात आली. त्यात शासनाच्या निकषात पात्र म्हणून चापोली येथील संजीवनी कनिष्ठ महाविद्यालयास जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार १८ परीसर हा स्वच्छ असणे विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्वाचे असते. विद्यालयाच्या परिसराची स्वच्छता, वर्ग खोल्यांची स्वच्छता, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, अपंगांसाठी विद्यालयातील विविध सुविधा, विद्यालय परीसर व इमारतीवर स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी पोस्टर यासह इतर निकषावर परीसर म्हणून ओळखल जातो. प्राचार्य डॉ. धनंज चाटे यांनी स्वच्छतेची परंपर पुढे चालवली आहे.

या गौरवा बद्द प्राचार्य डॉ. धनंजय चा व सर्व कर्मचाऱ्यांचे संस्थे अध्यक्ष विश्र्वनाथ शेटकर सचिव डॉ. भालचंद्र चाटे डॉ. रामाराव दुडीले, व्यंक होनराव, बब्रुवान आवस्कर रंजनाताई चाटे मलिकार्ज

पुरोगामी विचाराचे एकमत Next
बुधवार, दिनांक १० ऑगस्ट २०२२

## संजीवनी कनिष्ठ महाविद्यालयास 'स्वच्छता' पुरस्कार

चाकूर : तालुक्यातील चापोली येथील संजीवनी कनिष्ठ महाविद्यालयास जिल्हा स्तरीय 'स्वच्छ विदयालय' पुरस्कार जाहीर झाला आहे.

'स्वच्छ भारत_स्वच्छ विद्यालय' अभियाना अंतर्गत शिक्षण मंत्रालय ,भारत सरकार यांची स्वच्छ विद्यालय पुरस्कार २०२१-२२ ही स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. जिल्हा स्तरावरून सर्वसाधारण गटांतून या पुरस्कारासाठी चापोली येथील संजीवनी कनिष्ठ महाविद्यालयाची निवड करण्यात आली आहे. या पुरस्काराचे वितरण भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त १५ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० जिल्हा परिषदेच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
www.pudhari.com

# संजीवनी महाविद्यालयास पुरस्कार

चाकूर : स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय अभियानांतर्गत भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडून जिल्ह्यात स्वच्छ विद्यालयाची स्पर्धा घेण्यात आली. त्यात शासनाच्या निकषात पात्र म्हणून चापोली येथील संजीवनी कनिष्ठ महाविद्यालयास जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी कार्यक्रमात देण्यात आला. शिक्षणासोबतच विद्यालयाचा परिसर हा स्वच्छ असणे विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्तचे असते. विद्यालयाच्या परिसराची स्वच्छता, वर्गखोल्यांची स्वच्छता, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह,अपंगांसाठी विद्यालयातील विविध सुविधा, विद्यालय परिसर व इमारतीवर स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी पोस्टर यासह इतर निकषांवर ही स्पर्धा झाली होती. शिक्षण महर्षी स्व. डॉ. नारायण चाटे यांच्या परिश्रमामुळे संजीवनी संकुल स्वच्छ परिसर म्हणून ओळखला जातो. प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांनी स्वच्छतेची परंपरा पुढे चालवली आहे. या गौरवाबद्दल प्राचार्य डॉ. धनंजय चाटे व सर्व कर्मचाऱ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विश्वनाथ शेटकर, सचिव डॉ. भालचंद्र चाटे, डॉ. रामाराव दुडीले, व्यंकट होनराव, बब्रुवान आवस्कर, रंजनाताई चाटे, मल्लिकार्जुन स्वामी, काशिनाथ गंगापुरे, रामचंद्र तिरुके, भगवान सोमवंशी आदींनी अभिनंदन केले.

औरंगाबाद, शनिवार,
६ ऑगस्ट २०२२ ३

सकाळ TODAY



चापोली (ता. चाकूर) : संजीवनी महाविद्यालयातील प्रा. के. एम. इब्राहिम यांचा सत्कार करताना मान्यवर.

## के. एम. इब्राहिम यांचा सत्कार

चाकूर : चापोली (ता. चाकूर) येथील येथील संजीवनी महाविद्यालयातील उर्दु विषयाचे प्राध्यापक के. एम. इब्राहीम आपल्या प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत झाले. त्या निमित्त महाविद्यालयात त्यांचा सपत्नीक सत्कार करून निरोप देण्यात आला. प्राचार्य डॉ. धनंजय चाटे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर संस्थेचे सचिव डॉ. भालचंद्र चाटे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. रमेश गुट्टे, प्रा. एन. डी. नलवाड यांची उपस्थिती होती. प्रा. संदीप मुंढे यांनी प्रास्ताविक केले. तर प्रा. वामनराव कराड यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. अतुल धावारे, प्रा. विजय गुळवे, प्रा. इसाक, प्रा. मनोज मुंढे, प्रा. चंद्रकांत कदम, प्रा. जयचंद भताने, प्रा. एम. टी. केंद्रे, प्रा. आर डी मोरे, प्रा. डॉ. फुलचंद चाटे, प्रा. आणाराव केंद्रे, प्रा. नारायण निलापल्ले उपस्थित होते.

लातूर Live देशोन्नती
■ रविवार दि.७ ऑगस्ट २०२२■ https://www.deshonnati.com

# के. एम. इब्राहिम यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार

## उपस्थितांनी केला कार्याचा गौरव

देशोन्नती वृत्तसंकलन...

चापोली ■ येथील संजीवनी महाविद्यालयातील ऊर्दू विषयाचे प्राध्यापक के. एम. इब्राहिम आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत झाले. त्या निमित्त महाविद्यालयात त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे हे होते. व्यासपीठावर संस्था सचिव डॉ. भालचंद्र चाटे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. रमेश गुट्टे, प्रा. एन. डी. नलवाड उपस्थित होते.



के. एम. इब्राहीम हे विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून प्रसिद्ध आहेत. विषयाचे गाढे अभ्यासक व विद्यार्थ्यांमधे विषयाची रुची निर्माण करणारे प्राध्यापक म्हणून विद्यार्थ्यांमधे त्यांची ओळख आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. संदीप मुंढे यांनी केले तर आभार प्रा. वामनराव कराड यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अतुल धावारे, प्रा. विजय गुळवे, प्रा. इसाक, प्रा. मनोज मुंढे, प्रा. चंद्रकांत कदम, प्रा. जयचंद भताने, प्रा. घुले, प्रा. एम. टी. केंद्रे, प्रा. आर. डी. मोरे, प्रा. डोंगरे, प्रा. डॉ. फुलचंद चाटे, प्रा. अण्णाराव केंद्रे, प्रा. झिपरे, प्रा. गुरमे, प्रा. नारायण निलापल्लेसह महाविद्यालयातील आदी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्रदीर्घ सेवेनंतर प्रा. के. एम. इब्राहिम हे आज सेवानिवृत्त होत आहेत. ही सेवानिवृत्ती नसून जगण्याची नवी आवृत्ती आहे. प्रा. इब्राहिम यांच्या जीवनाची दुसरी इनिंग सुरू झाली आहे, असे मत प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांनी यावेळी व्यक्त केले व त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# संजीवनी महाविद्यालयाच्या वतीने वृक्षदिंडी

**चाकूर:** चाकूर तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवारी दि. २९ . आजनसोंडा रोडच्या दुतर्फा महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी वृक्षदिंडी काढुन वृक्षारोपण करण्यात आले.

संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे व चापोली ग्रामपंचायतचे ग्रामसेवक कुरुळेकर यांच्या हस्ते शिक्षणमहर्षी स्व. डॉ. नारायणराव चाटे यांच्या प्रतिमेचे पूजन करून व श्रीफळ फोडून वृक्षारोपन आभियानाची सुरुवात करण्यात आली. जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी जिल्ह्यात वृक्षारोपण मोहीम हाती घेतली आहे. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्याच्या पुढाकाराने अजनसोंडा रोडच्या दोन्ही बाजूने एक हजार वृक्षाची लागवड करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जितेंद्र कांबळे, प्रा. नारायण खेडकर, प्रा. रमेश गुट्टे, प्रा. आर. डी. मोरे, प्रा. नारायण निलापल्ले, प्रा. विजयकुमार गूळवे, प्रा. डॉ. धीरज व्हत्ते, प्रा. डॉ. विजयकुमार ढोले, प्रा. संदीप मुंढे, प्रा. चंद्रकांत कदम, प्रा. गौतम बनसोडे, प्रा. दिपक मोरे, प्रा. उत्तम भालेराव, प्रा. गणेश मदने, प्रा. अण्णाराव केंद्रे, प्रा. डॉ. एम डी पठाण, प्रा. डॉ. नारायण जायभाये, प्रा. मनोज मुंढे, शिवाजी कांबळे, संतोष बामने, पेटकर सह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



लोकमत
शनिवार, ३०.७.२०२२

# विद्यार्थिनींना मोफत एसटी पास वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

चापोली : राज्य शासनाच्या वतीने इयत्ता अकरावी व बारावीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी मोफत एसटी पास योजना सुरु करण्यात आली आहे. या मोफत पास वाटपाचा प्रारंभ येथील संजीवनी महाविद्यालयात झाला.

ग्रामीण भागातील शेतकरी, मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या पालकांना आपल्या मुलींना शिक्षण देण्यासाठी अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे शासनाने मुलींच्या शिक्षणासाठी मोफत एसटी पास योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे मुलींना मोफत एसटी प्रवास करून आपले शिक्षण पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे विद्यार्थिनींतून समाधान व्यक्त होत आहे. चापोली येथील संजीवनी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते महाविद्यालयात शिक्षणासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या मुलींना मोफत एसटी पासचे वाटप करण्यात आले.

यावेळी नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव उपप्राचार्य डॉ. भालचंद्र चाटे, गौसभाई शेख, उपप्राचार्य रमेश गुटे, प्रा. परमेश्वर डिगोळे, प्रा. आर. डी. मोरे आदींसह प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

पुण्य नगरी
SMART
लातूर
बुधवार, २७ जुलै २०२२

# संजीवनी महाविद्यालयात मुलींना मोफत एसटी पासचे वाटप



चापोली : महाराष्ट्र शासनाच्यावतीने इयत्ता आकरावी व बारावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींसाठी मोफत एसटी पास योजना चालू करण्यात आलेली आहे. या वर्षीचा मोफत पास वाटपाचा शुभारंभ संजीवनी महाविद्यालयांमध्ये विद्यार्थिनींना मोफत पासचे वाटप करून करण्यात आला.

ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरी करून घर चालविणाऱ्या पालकांना आपल्या मुलींना शिक्षण देण्यासाठी अडचणींना सामोरे जावे लागते. उच्च माध्यमिकचे शिक्षण घेण्यासाठी दुसऱ्या गावी जावे लागते. मात्र अनेक पालके प्रवास खर्चही करू शकत नाहीत. परिणामी इच्छा असूनही आपल्या मुलींना ते पुढील शिक्षण देऊ शकत नसल्याची अनेक उदाहरणे समोर आल्यावर शासनाने मुलींच्या शिक्षणासाठी 'संजीवनी' ठरणारी मोफत एसटी पास योजना सुरू केली. या योजनेमुळे मुलींना मोफत एसटी प्रवास करून आपले शिक्षण पूर्ण करता येणार आहे. यामुळे मुलींमधे उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले.

सोमवारी दि. २५ जुलै रोजी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते महाविद्यालयात शिक्षणासाठी बाहेर गावावरून येणाऱ्या मुलींना मोफत एसटी पासचे वाटप करण्यात आले. यावेळी नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव उपप्राचार्य डॉ. भालचंद्र चाटे, गौसभाई शेख, उपप्राचार्य रमेश गुटे, प्रा. परमेश्वर डिगोळे, प्रा. आर. डी. मोरे उपस्थित होते.

लातूर Next
पुरोगामी विचाराचे एकमत
लातूर, मंगळवार, दिनांक २६ जुलै २०२२

# 'संजीवनी'मध्ये मुलींना मोफत एसटी पासचे वाटप

**चाकूर :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने इयत्ता आकरावी व बारावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीसाठी मोफत एसटी पास योजना सुरू करण्यात आली आहे. या वर्षीचा मोफत पास वाटपाचा शुभारंभ संजीवनी महाविद्यालयांमध्ये करण्यात आला.

ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरी करून घर चालविणाऱ्या पालकांना आपल्या मुलींना शिक्षण देण्यासाठी अडचणींना सामोरे जावे लागते. उच्च माध्यमिकचे शिक्षण घेण्यासाठी दुसऱ्या गावी जावे लागते. अनेक पालके प्रवास खर्चही करू शकत नाहीत परिणामी इच्छा असूनही आपल्या मुलींना ते पुढील शिक्षण देऊ शकत नसल्याची अनेक उदाहरणे समोर आल्यावर शासनाने मुलींच्या शिक्षणासाठी 'संजीवनी' ठरणारी मोफत एसटी पास योजना सुरू केली.



या योजनेमुळे मुलींना मोफत एसटी प्रवास करून आपले शिक्षण पूर्ण करता येणार आहे. यामुळे मुलींमधे उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले.

सोमवारी दि. २५ महाविद्यालयात प्राचार्य डॉ धनंजय चाटे यांच्या हस्ते महाविद्यालयात शिक्षणासाठी बाहेर गावहून येणाऱ्या मुलींना मोफत एसटी पासचे वाटप करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. भालचंद्र चाटे, गौस शेख, तसेच उपप्राचार्य रमेश गुटे, प्रा. परमेश्वर डिगोळे, प्रा. आर. डी. मोरे हे उपस्थित होते.

सकाळ

औरंगाबाद, बुधवार,
२२ जून २०२२



चापोली येथील संजीवनी महाविद्यालयात योग दिन साजरा करण्यात आला.

## संजीवनी महाविद्यालय, चापोली

**चाकूर :** चापोली (ता. चाकूर) येथील संजीवनी महाविद्यालयात मंगळवारी (ता. २१) आंतराराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिर झाले. प्राचार्य डॉ. डी. एन. चाटे यांच्या हस्ते योग शिबिर झाले. भाई किशनराव देशमुख महाविद्यालयातील प्रा. डॉ. भानुदास पवार, सुमन पवार, अशोक गायकवाड यांनी उपस्थितांना योगाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी संस्था सचिव तथा उपप्राचार्य डॉ. भालचंद्र चाटे,प्रा. रमेश गुट्टे,प्रा. डॉ. नारायण जायभाये,प्रा. संदीप मुंढे,प्रा. गोविंद फड, प्रा. माधव कागणे,प्रा. मनोज मुंढे, प्रा. जयचंद भताने, प्रा. वामन कराड, प्रा. चंद्रकांत कदम, प्रा. नारायण निलापल्ले, प्रा. नितीन अवस्कर, प्रा. विजय गुळवे आदी उपस्थित होते.

लातूर Next
पुरोगामी विचाराचे एकमत
लातूर, बुधवार, दिनांक २२ जून २०२२

# 'संजीवनी'त योग शिबिर उत्साहात

**चाकूर :** तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महाविद्यालयात मंगळवारी (दि. २१) आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

शक्ती व भक्तीची देवता हनुमान व शिक्षणमहर्षी स्व. डॉ. नारायणराव चाटे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून आंतरराष्ट्रीय योग शिबिराची सुरुवात झाली.



भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. भानुदास पवार, सौ. सुमन पवार व अशोक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली योग शिबीर झाले. प्रा. डॉ. भानुदास पवार व सौ. सुमन पवार यांनी योगाचे मानवी जीवनात काय महत्व आहे याची माहिती दिली. यावेळी प्राचार्य डॉ. धनंजय चाटे, संस्था सचिव तथा उपप्राचार्य डॉ. भालचंद्र चाटे, मुख्याध्यापक चिमेगावे, प्रा. रमेश गुट्टे, पर्यवेक्षक अंकुशे, प्रा. डॉ. नारायण जायभाये, प्रा. संदीप मुंढे, प्रा. गोविंद फड, प्रा. माधव कागणे, प्रा. मनोज मुंढे, प्रा. जयचंद भताने, प्रा. वामन कराड, प्रा. चंद्रकांत कदम, प्रा. नारायण निलापल्ले, प्रा. नितीन अवस्कर, प्रा. विजय गुळवे सह आदी उपस्थित होते.

## वातृत्व वाढवल्यास अन्नछत्र चांगले चालेल - गुरुराज स्वामी

अहमदपूर : आपल्या देशामध्ये सर्वच क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक प्रगती झालेली आहे, पण समाजातील लोक एकमेकांचे पाय ओढण्यामध्ये व्यस्त आहेत. असे सांगून समाजातील समता, विषमता दूर करण्यासाठी दातृत्वाची वृत्ती वाढली तर मंदिर संस्थानातील अन्नछत्र चांगल्या पद्धतीने चालतील. त्यासाठी भाविकांनी सकारात्मक मदत व प्रयत्न करावेत, असे आवाहन भक्तीस्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी यांनी केले. भक्तीस्थळ येथे गुरू पालखी महोत्सवाच्या निमित्ताने भाविकांसाठी अन्नछत्राच्या शुभारंभप्रसंगी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भक्तीस्थळ विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष शि.भ.प. भगवंतराव पाटील चांबरगेकर, सचिव सुप्रिया घोटे, सदस्य शिवप्रसाद कोरे, सदस्य मन्मथप्पा पालापुरे, शीला शेटकर, अॅड. बाबुराव देशमुख, धन्यकुमार शिवणकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. अन्नछत्रे यशस्वी करण्यासाठी अन्नछत्राचे प्रमुख मन्मथ बिराजदार, विठ्ठलराव गुडमे, ओमप्रकाश पुणे, गुंडप्पा तत्तापुरे, अश्विन आंधळे, सचिन काडवादे यांच्यासह अन्नछत्राच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. हे अन्नछत्र हे सकाळी ११ ते दुपारी २ आणि सायंकाळी ५ ते रात्री ८ या दरम्यान चालणार आहे.

# लातूर जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा

***लातूर, दि. २१ ( प्रतिनिधी ) जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय योगदिन विविध ठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा क्रीडा संकुलात रोज लोकांचा व्यायामाचा राबता असतो, मात्र मंगळवारी सकाळी जागतिक योगदिनाचे औचित्य साधून***



मुगळे, मुख्याध्यापक व्ही.व्ही. गंपले, यांनी शिक्षक गौरव चवंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. योग शिक्षक गौरव चवंडा यांनी योग प्रात्यक्षिक करून 'करे योग रहे निरोग' हा संदेश घराघरात राबवा, असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोप व्ही.व्ही. गंपले यांनी केला. प्रास्ताविक रामलिंग तत्तापुरे यांनी केले. सूत्रसंचालन के.डी. बिराजदार यांनी केले तर आभार राजकुमार पाटील यांनी मानले. या शिबिराला उपप्राचार्य प्रा. बालाजी गोडभरले, उपमुख्याध्यापक रमाकांत कोडलवाडे, पर्यवेक्षक उमाकांत नरडेले, दिलीप गुळवे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, योगप्रेमी पालक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

### रेणापूर

रेणापूर : तालुक्यातील दर्जी बोरगाव, बिटरगाव, आरजखेडा, खरोळा यांच्यासह अनेक रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये, शासकीय हॉस्पिटल अशा अनेक संस्था व शासकीय कार्यालयांमध्ये जागतिक योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

दर्जी बोरगाव येथील चिन्मयानंद स्वामी विद्यालयामध्ये पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना शाळेचे विद्यार्थ्यांना योगाचे धडे योग गुरू पांचाळ यांनी सोप्या पद्धतीने दिले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक पवार, सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

### जिल्हा कारागृहातील कैद्यांसाठी योग

लातूर, दि. २१ (प्रतिनिधी) - येथील दयानंद कला महाविद्यालयातील प्रा.डॉ. संदीपान जगदाळे यांनी कैद्यांना योगाचे धडे दिले. त्यांनी दिलेल्या योगाच्या अनुभूतीमुळे लातूर जिल्हा कारागृहातील बंदिवासात असलेल्या कैद्यांनी आज मोकळा श्वास घेतला. तुरुंगात असूनही मुक्तीची अनुभूती घेतली. या शिबिरातून त्यांनी सूक्ष्म व्यायाम, योगासने, प्राणायाम व ध्यान याचा आनंद घेतला.

जिल्हा विधिसेवा प्राधिकरण व लातूर जिल्हा कारागृह यांच्या वतीने जिल्हा कारागृहातील कैद्यांसाठी या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हा सत्र न्यायाधीश ४ डी. बी. माने यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा विधिसेवा प्राधिकरण सचिव एस.डी. अवसेकर, जिल्हा कारागृह अधीक्षक लहू सांगळे यांनी मार्गदर्शन केले. न्यायाधीश के.के. वाघमारे, न्यायाधीश एन.जे. चव्हाण, न्यायाधीश एन.एस. लूनिया, अॅड. रमेश कुचमे आदी पोलीस व न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

... भागातील स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक कॉलेजच्या सभागृहात योग प्राणायाम शिबिर घेण्यात आले.

यावेळी पतंजली योग समितीचे महाराष्ट्र प्रभारी विष्णू भुतडा, व्यंकटेश ... होते. ताडासन, पदहस्तासन, त्रिकोणासन, वज्रासन, शलभासन, धनुरासन, चतुरंग डांस, भुजंगासन, चक्रासन, कपालभाती, अनुलोमविलोम असे अनेक प्रकारचे योगासने लातूर येथील योग शिक्षक ... योगासन करून घेतला. सूर्य नमस्कारही शिकवण्यात आले. योगदिनाच्या यशस्वितेसाठी स्कूलचे संचालक कोळ्ळे, शिक्षकवृंद वैशाली कोळ्ळे, सुरेखा जाजू, संगीत विभुते, रेणुका कोळ्ळे, रामेश्वरी पाटील यांनी परिश्रम घेतले.



रेणापूर तालुक्यातील अनेक शाळांमध्ये योगदिन साजरा करण्यात आला.

लातूर
# सिटी न्युज
संपादक : गणेश स्वामी मो.नं. ८४०७९१५३७०

# विद्यार्थी प्रिय प्राचार्य: डॉ. धनंजय चाटे...

आज संजीवनी महाविद्यालयाचे कर्तव्यदक्ष प्राचार्य डॉक्टर धनंजय नारायणराव चाटे यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा..

माजी बांधकाम व आरोग्य सभापती दिवंगत नारायणराव चाटे यांचे सुपुत्र असलेले प्राचार्य डॉक्टर धनंजय चाटे हे संजीवनी महाविद्याल - याचे प्राचार्य म्हणून सध्या कार्यरत आहेत.

प्राचार्य धनंजय चाटे यांनी प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी अत्यंत पद्धतशीरपणे संजीवनी शैक्षणिक संकुलाचा मोठ्या प्रमाणात शैक्षणिक विकास घडवून आणलेला आहे. आपल्या भागातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे ही भूमिका घेऊन नारायणराव चाटे यांनी जे शैक्षणिक संकुल उभा केलं त्या शैक्षणिक संकुल याला मुर्त स्वरूप देण्याचं काम नारायणराव चाटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य धनंजय चाटे यांनी केलं. आज बी एस सी चे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना अहमदपूर नंतर लातूरला जावं लागतं मात्र विद्यार्थ्यांची भूक लक्षात घेऊन प्राचार्य धनंजय चाटे यांनी चापोली मध्ये बीएससी सुरू केली व जिल्ह्यात सर्वाधिक तुकड्या सुद्धा याच महाविद्यालयात आहेत हे विशेष. प्राचार्य धनंजय चाटे यांनी केवळ बीएससी शिक्षण सुरु करून न थांबता बीएससी झाल्यानंतर विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन त्यांनी एम एस सी सुद्धा त्या ठिकाणी सुरु केली. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र असेल किंवा विद्यापीठात जो काही नवीन कोर्स असेल तर प्रत्येक कोर्स सर आपल्या महाविद्यालयात कसा आणला जाईल याचा कडे सुद्धा यांचे कटाक्षाने लक्ष असतं यामुळेच प्राचार्य धनंजय



गणेश स्वामी
संपादक

धनंजय चाटे

चाटे यांनी संजीवनीची शैक्षणिक प्रगती मोठ्या प्रमाणात झाली आहे.

प्राचार्य पद हे अत्यंत महत्वाचं पद असतं परंतु अनेक प्राचार्य हे महाविद्यालयात बसत सुद्धा नसतात मात्र मला आवर्जून सांगावसं वाटतं की संजीवनी महाविद्याल याचे प्राचार्य डॉक्टर धनंजय चाटे हे विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक वेळेस प्रत्येक क्षणाला उपलब्ध असतात यामुळे विद्यार्थी प्रिय प्राचार्य म्हणून प्राचार्य धनंजय चाटे यांचा उल्लेख करणे गरजेचे आहे..

प्राचार्य धनंजय चाटे हे केवळ शैक्षणिक क्षेत्रातच काम करत नाहीत तर सामाजिक क्षेत्रात सुद्धा त्यांनी मोठ्या प्रमाणात काम त्यांनी केलेला आहे. महाविद्यालयाच्या माध्यमातून शासनाचे विविध उपक्रम राबवून विविध सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक कार्यक्रमाचं महाविद्यालयात आयोजन करुन विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम सुद्धा प्राचार्य धनंजय चाटे यांच्या कडून करण्यात येतं.

महाविद्यालयात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करणे, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे अशा विविध विक्रमाच्या आयोजनाच्या माध्यमातून महाविद्यालयाचा दर्जा वाढवण्याचं काम सुद्धा प्राचार्य धनंजय चाटे यांनी केला आहे.

संजीवनी महाविद्यालयाला प्राचार्य डॉक्टर धनंजय चाटे यांच्या योग्य नियोजनबद्ध प्रणाली मुळे ग्रामीण महाविद्यालयाचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा प्रथम पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे. महाविद्यालयाला नॅकचे सुद्धा नामांकन सुद्धा प्राचार्यांच्या नीयोजनामुळे प्राप्त झाले आहे.

प्राचार्य डॉक्टर धनंजय चाटे यांची विविध राजकीय मान्यवरांशी अत्यंत घनिष्ठ संबंध आहेत अनेक प्रशासकीय मान्यवरांशी सुद्धा संबंध आहेत याच संबंधामुळे प्राचार्य डॉक्टर धनंजय चाटे यांनी महाविद्यालयाला विविध उपक्रम त्यांच्या 'माध्यमातून ते खेचून आणत असतात.

खरतर नवयुवक शिक्षण संस्थेचे सचिव माजी बांधकाम व आरोग्य सभापती नारायणराव चाटे गुरुजी यांच्या निधनाने एक मोठी पोकळी निर्माण झाली असली तरी प्राचार्य धनंजय चाटे यांच्या नियोजनबद्धमुळे येणाऱ्या काळात महाविद्यालय अनेक शिखरे पादाक्रांत करणार यात कुठलीही शंका नाही..

आपल्या सर्वांचे लाडके व्यक्तिमत्व, विद्यार्थ्यांमध्ये सहज त्यांचे प्रश्न सोडवणारे प्राचार्य, प्राध्यापकांशी अत्यंत सौजन्याने वागणारे प्राचार्य, व कुठलाही मोठा बडेजावपणा न दाखवता अत्यंत सर्वसामान्य नागरिकांसह सारखे सर्वांना सन्मान देणारे प्राचार्य डॉक्टर धनंजय नारायणराव चाटे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या इच्छा, आशा, आकांक्षा, अपेक्षा, आई जगदंबा पूर्ण करो हीच वाढदिवसाच्या निमित्तानं मी प्रार्थना करतो....

दिनांक १२ जून २०२२

पुरोगामी विचाराचे
एकमत

# संजीवनी महाविद्यालयाचे घवघवीत यश

**चाकूर : प्रतिनिधी**

चाकूर तालुक्यातील चापोली संजीवनी महाविद्यालयाने बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

महाविद्यालयात ७९५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ७४९ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. त्यात १६९ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून ४६९ विद्यार्थी प्रथम तर ४१० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा ९० टक्के, विज्ञान शाखेचा ९६.१९ टक्के तर वाणिज्य शाखेचा ९८.०७ टक्के निकाल लागलेला आहे. तर महाविद्यालयाचा एकूण निकाल ९४.२१ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेतून श्रद्धा वंगवाड ८८.३३ टक्के, वैभव चोले ८६ टक्के तर स्वाती मोरे ८५.८३ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत. वाणिज्य शाखेतून श्वेता कारागीर ८१.३३ टक्के, सुदाम चात्रे ८१.१७ टक्के तर आदित्य पेटकर ७८.८३ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत. कला शाखेत किरण झोले ८१.५० टक्के, राधा पवार ७८.१७ टक्के तर गोपाळ कदम ७८ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत.

बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे अध्यक्ष विश्वनाथराव शेटकर, उपाध्यक्ष डॉ. रामराव दुडिले, सचिव डॉ. भालचंद्र नारायणराव चाटे, रामचंद्र तीरुके, काशिनाथ गंगापुरे, रंजनाताई कराड, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे, प्रा. रमेश गुट्टे, मु.अ. चिमेगावे सह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

**हिंदी विषयात भरारी**

हिंदी विषयात वैष्णवी शिंदे, जयनंदिनी मसुरे व ओमकार पुरी या तीन विद्यार्थ्यांनी हिंदी विषयात ९७ गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम तर लातूर बोर्डात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. याबद्दल या तिघांचेही विशेष कौतुक केले जात आहे.

लोकमत

epaper.lokmat.com

औरंगाबाद, रविवार, दि. १२ जून २०२२



# संजीवनी महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत यश

## ९४.२१ टक्के निकाल : यशाची परंपरा कायम

लोकमत न्यूज नेटवर्क

चापोली : येथील संजीवनी महाविद्यालयाने बारावी बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले असून, यशाची परंपरा कायम ठेवली आहे. महाविद्यालयाचा ९४.२१ टक्के निकाल लागला आहे.

विज्ञान शाखेतून श्रद्धा वंगवाड ८८.३३ टक्के, वैभव चोले ८६ टक्के तर स्वाती मोरे ८५.८३ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत. वाणिज्य शाखेतून श्वेता कारागीर ८१.३३ टक्के, सुदाम चात्रे ८१.१७ टक्के तर आदित्य पेटकर ७८.८३ टक्के तर कला शाखेत किरण झोले ८१.५० टक्के, राधा पवार ७८.१७ टक्के तर गोपाळ कदम ७८ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत. हिंदी विषयात वैष्णवी शिंदे, जयनंदिनी मसुरे व ओमकार पुरी या तीन विद्यार्थ्यांनी ९७ गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम तर लातूर बोर्डात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

- महाविद्यालयातील एकूण ७९५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ७४९ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. त्यात १६९ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह ४६९ विद्यार्थी प्रथम तर ४१० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा ९० टक्के, विज्ञान शाखेचा ९६.९९ टक्के तर वाणिज्य शाखेचा ९८.०७ टक्के निकाल लागलेला आहे. महाविद्यालयाचा निकाल ९४.२१ टक्के लागला आहे.

यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे अध्यक्ष विश्वनाथराव शेटकर, उपाध्यक्ष डॉ.रामराव दुडिले सचिव डॉ. भालचंद्र नारायणराव चाटे, रामचंद्र तिरुके, काशिनाथ गंगापुरे, रंजनाताई कराड, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे, प्रा. रमेश गुट्टे, मुख्याध्यापक चिमेगावे आदींनी कौतुक केले आहे.

सकाळ

औरंगाबाद, शनिवार,
११ जून २०२२

# संजीवनी महाविद्यालयाचे बारावीच्या परीक्षेत यश

**चाकूर, ता. १० (बातमीदार)** : चामोली (ता. चाकूर) येथील संजीवनी महाविद्यालयाने बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा निकाल ९४.२१ टक्के लागला आहे.

महाविद्यालयात ७९५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी ७४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यात १६९ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून ४६९ विद्यार्थी प्रथम तर ४१० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. कला शांखेचा निकाल ९० टक्के, विज्ञान शाखेचा ९६.१९ टक्के तर वाणिज्य शाखेचा ९८.०७ टक्के निकाल लागला आहे.

विज्ञान शाखेतून श्रद्धा वंगवाड ८८.३३ टक्के, वैभव चोले ८६ टक्के तर स्वाती मोरे ८५.८३ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत. वाणिज्य शाखेतून श्वेता कारागीर ८१.३३ टक्के, सुदाम चात्रे ८१.१७ टक्के तर आदित्य पेटकर ७८.८३ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत. कला शाखेत किरण झोले ८१.५० टक्के, राधा पवार ७८.१७ टक्के तर गोपाळ कदम ७८ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत.

हिंदी विषयात वैष्णवी शिंदे, जयनंदिनी मसुरे व ओमकार पुरी या तीन विद्यार्थ्यांनी ९७ गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम तर लातूर बोर्डात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विश्वनाथराव शेटकर, डॉ. रामराव दुडिले, सचिव डॉ. भालचंद्र चाटे, प्राचार्य डॉ. धनंजय चाटे, प्रा. रमेश गुट्टे यांनी अभिनंदन केले आहे.

पुण्य नगरी

शनिवार, ११ जून २०२२

# संजीवनी महाविद्यालयाचा ९४.२१ टक्के निकाल

**चापोली :** येथील संजीवनी महाविद्यालयाने बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

महाविद्यालयात ७९५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ७४९ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. त्यात १६९ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून ४६९ विद्यार्थी प्रथम तर ४१० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा ९० टक्के, विज्ञान शाखेचा ९६.१९ टक्के तर वाणिज्य शाखेचा ९८.०७ टक्के निकाल लागलेला आहे. तर महाविद्यालयाचा एकूण निकाल ९४.२१ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेतून श्रद्धा वंगवाड ८८.३३ टक्के, वैभव चोले ८६ टक्के तर स्वाती मोरे ८५.८३ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत. वाणिज्य शाखेतून श्वेता कारागीर ८१.३३ टक्के, सुदाम चात्रे ८१.१७ टक्के तर आदित्य पेटकर ७८.८३ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत. कला शाखेत किरण झोले ८१.५० टक्के, राधा पवार ७८.१७ टक्के तर गोपाळ कदम ७८ टक्के घेऊन अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले आहेत. बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे अध्यक्ष विश्वनाथराव शेटकर, उपाध्यक्ष डॉ.रामराव दुडिले, सचिव डॉ. भालचंद्र नारायणराव चाटे, रामचंद्र तीरुके, काशिनाथ गंगापुरे, रंजनाताई कराड, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, प्राचार्य डॉ.धनंजय नारायणराव चाटे, प्रा. रमेश गुट्टे, मु.अ.चिमेगावेसह प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

WWW.SHUBHDIN.NET
शुभ दिन
परिवाराचं परिपूर्ण दैनिक

# अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिनाचा पहिला दिवस उत्साहात



चापोली / प्रतिनिधी

येथे भारत देशाच्या अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त उत्सवाच्या पहिल्या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये सकाळी शाळा - महाविद्यालय ग्रामपंचायत, प्राथमिक आरोग्य केंद्र, महावितरण व विविध ठिकाणी ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाले.

संजीवनी महाविद्यालय व स्वामी विवेकानंद विद्यालयांमध्ये संस्थाचालकांचे हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. तर संत ज्ञानेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात महिलांना ध्वजारोहणाचा मान देत सौ संध्याताई वैकुंठ मद्रेवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ग्रामपंचायत मध्ये सरपंच रेखाताई मद्रेवार यांच्या हस्ते ध्वजारोहन संपन्न झाले.

गोपाळ पंगतीती मुळे मोठा उत्साह

आज शासन निर्देशानुसार गोपाल पंगतीतिचे आयोजन करण्याचे आदेश देण्यात आले होते त्याप्रमाणे त्या पद्धतीने आज संजीवनी महाविद्यालयात प्राचार्य डॉक्टर धनंजय चाटे यांच्या पुढाकारातून गोपाल पंगत चे आयोजन करण्यात आले होते. या वेळी दीड ते दोन हजार विद्यार्थ्यांनी या गोपाल पंगततिचा आस्वाद घेतला.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक परमेश्वर स्वामी यांच्या पुढाकारातून गोपाल पंगती चे आयोजन करण्यात आले होते.

चापोली येथील माजी ग्रामपंचायत सदस्या सौ. पार्वती रविशंकर स्वामी यांच्या वतीने चापोली येथील सर्व सातही अंगणवाडीतील सर्व चिमुकल्याना गोपाळ पंगतीचे चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अंगणवाडी पर्यवेक्षिका आशा कार्यकर्ती मदतनीस आदी उपस्थित होते.

# संजीवनी महाविद्यालयाच्या वतीने वृक्षदिंडी काढुन वृक्षारोपण

**चापोली/प्रतिनिधी :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतम होत्सवी वर्षानिमित्त चाकूर तालुक्यातील चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाच्या वतीने वृक्षदिंडी काढुन आजनसोंडा रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले.

संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चाटे व चापोली ग्रामपंचायत चे ग्रामसेवक कुरुळेकर यांच्या हस्ते शिक्षण महर्षी स्व. डॉ. नारायणराव चाटे यांच्या प्रतिमेचे पूजन करून व श्रीफळ फोडून वृक्षारोपन आभियानाची सुरुवात करण्यात आली. जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी पी यांनी लातूर जिल्हात वृक्षारोपण मोहीम हाती घेतली आहे. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत चापोली येथील संजीवनी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या पुढाकाराने एक हजार वृक्षाची लागवड करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जितेंद्र कांबळे, प्रा. नारायण खेडकर, प्रा. रमेश गुट्टे, प्रा. आर डी मोरे, प्रा. नारायण निलापल्ले, प्रा. विजयकुमार गूळवे, प्रा. डॉ. धीरज व्हत्ते, प्रा. डॉ. विजयकुमार ढोले, प्रा. संदीप मुंढे, प्रा. चंद्रकांत कदम, प्रा. गौतम बनसोडे, प्रा. दिपक मोरे, प्रा. उत्तम भालेराव, प्रा. गणेश मदने, प्रा. अण्णाराव केंद्रे, प्रा. डॉ. एम डी पठाण, प्रा. डॉ. नारायण जायभाये, प्रा. मनोज मुंढे, शिवाजी कांबळे, संतोष बामने, पेटकर सह विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता.

Email : shubhdinltr@gmail.com
शुभ दिन
WWW.SHUBHDIN.NET
SHUBHDIN

# मुलींना मोफत एसटी पासचे वाटप

संगमेश्वर जनगावे

**चाकूर :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने इयत्ता आकरावी व बारावी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीसाठी मोफत एस.टी. पास योजना चालू करण्यात आलेली आहे. या वर्षीचा मोफत पास वाटपाचा शुभारंभ चापोली येथील संजीवनी महाविद्यालयांमध्ये विद्यार्थिनींना मोफत पासचे वाटप करून करण्यात आला.



ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरी करून घर चालवणाऱ्या पालकांना आपल्या मुलींना शिक्षण देण्यासाठी अडचणींना सामोरे जावे लागते. उच्च माध्यमिक चे शिक्षण घेण्यासाठी दुसऱ्या गावी जावे लागते. मात्र अनेक पालके प्रवास खर्च ही करू शकत नाहीत. परिणामी इच्छा असूनही आपल्या मुलींना ते पुढील शिक्षण देऊ शकत नसल्याची अनेक उदाहरणे समोर आल्यावर शासनाने मुलींच्या शिक्षणासाठी 'संजीवनी' ठरणारी मोफत एस.टी. पास योजना सुरू केली. या योजनेमुळे मुलींना मोफत एस.टी. प्रवास करून आपले शिक्षण पूर्ण करता येणार आहे.. यामुळे मुलींमधे उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले. सोमवारी (दि.२५) महाविद्यालयात प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांच्या हस्ते महाविद्यालयात शिक्षणासाठी बाहेर गावावरून येणाऱ्या मुलींना मोफत एस.टी. पास चे वाटप करण्यात आले.



# संजीवनी कनिष्ठ महाविद्यालयास स्वच्छतेचा पुरस्कार

**चाकूर** : स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय अभियान अंतर्ग भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडून जिल्ह्यातील स्वच्छ विद्यालय स्पर्धा घेण्यात आली. त्यात शासनाच्या सर्व कसोटीव पात्र ठरत चाकूर तालुक्यातील चापोली येथील संजीवनी कनि महाविद्यालयास स्वच्छता पुरस्कार मिळाला. हा प्रथम पुरस्का जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभू जाधव यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन संस्थेचे सचिव डॉ भालचंद्र चाटे यां गौरविण्यात आले आहे. या गौरवाबद्दल प्राचार्य डॉ. धनंजय चा व सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

युवा पर्व महाराष्ट्र NEWS

yuvaparvmaharashtra@gmail.com

:बातम्या व जाहीरात साठी संपर्क करा मुख्य संपादक रविसर बिजलवाड फोन ९७३०३५३००१

# शिक्षण महर्षी कर्मवीर डॉ.नारायणराव दौलतराव चाटे यांच्या स्मरनार्थचापोली येथील संजीवनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी बागेत बसण्यासाठी सिमेंट बेंचची सुविधा.





चांदोली - दि. ०६/०८/२०२२. शिक्षण महर्षी कर्मवीर डॉ.नारायणराव दौलतराव चाटे यांच्या स्मरनार्थचापोली येथील संजीवनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी बागेत बसण्यासाठी सिमेंट बेंचची सुविधा चापोली येथील शिक्षणप्रेमी, संजीवनी विद्यालयाचे माजी विद्यार्थी, दानशुर व्यक्ती मा.श्री गंगाप्रसाद मारोती मद्रेवार,मा.श्री.रत्नाप्पा विठ्ठलप्पाआलमले,मां.श्री.फारुख दस्तगीर मोमिन,मा.कै.दिगंबर मनोहर मद्रेवार यांच्या स्मरणार्थ मा.श्री.अनंत दिगंबर मद्रेवार,मा.श्री.धिरज वैकुंठ मद्रेवार,मा.श्री.ज्ञानेश्वर निवृती पांचाळ,मा.श्री.कृष्णाजी नागनाथ यंचेवाड,मा.श्री.दिलिप मारुती चिमेगावे यांच्या तर्फे आज दिनांक ६/७/२०२२ रोजी सेवेत सादर करण्यात आले.त्या बद्दल नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळ चापोली व संजीवनी महाविद्यालय चापोली यांचे वतीने सर्वांचे हार्दिक हार्दिक आभार. मा.गंगाप्रसादजी मद्रेवार यांनी पुढाकार घेऊन वरील सर्व दानशुरांच्या वतिने सर्व बेंच आनुन महाविद्यालयात बसवले त्या बद्दल त्यांचेही आभार.

Email : shubhdinltr@gmail.com

WWW.SHUBHDIN.NET

# शुभ दिन

SHUBHDIN

# प्रत्येक मूल शिकले पाहिजे : गोयल

संगमेश्वर जनगावे

चाकूर : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड, शिक्षण विभाग जिल्हा परिषद लातूर व पंचायत समिती चाकूर यांच्या संयुक्त विद्यमाने चाकूर येथील 'माझी माय' या मंगल कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय शिक्षण परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी जिल्हाभरातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

सेतू पूर्व चाचणी व उत्तर चाचणी यातून आलेल्या माहितीचे विश्लेषण आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीचे विश्लेषण यावर त्यांनी विचारणा केली. प्रत्येक मूल क्षमताधिष्ठित झाले पाहिजे. यासाठी प्रत्येक मुलाचा मूलनिहाय कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. वर्गातील प्रत्येक मुलाच्या प्रगतीच्या नोंदी वर्गशिक्षकांनी नियमितपणे ठेवणे व त्यांच्या अध्ययन निष्पत्ती विकसित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ती आपली जबाबदारी आहे अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. शिक्षण परिषदेचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी सहाय्यक शिक्षण संचालक दत्तात्रय मठपती, शिक्षणाधिकारी प्राथमिक वंदना फुटाणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य राजेंद्र गिरी, जिल्हा गुणवत्ता कक्षाच्या प्रमुख डॉ. भागीरथी गिरी, उपशिक्षणाधिकारी भगवान फुलारी, प्राचार्य धनंजय चाटे, स्काऊट




गाईड चे जिल्हा संघटक शंकर चामे, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक तृप्ती अंधारे यांच्यासह तालुक्याचे शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, विषय साधन व्यक्ती, विशेष शिक्षक आणि चाकूर तालुक्यातील सर्व शिक्षक बांधव या परिषदेत उपस्थित होते.

सदरील शिक्षण परिषदेत अध्ययन स्तर निश्चिती व मूलनिहाय कृती आराखडा सेतू पूर्व चाचणी व उत्तर चाचणी निकालाचे विश्लेषण डॉक्टर भागीरथी गिरी यांनी मांडले, आनंददायी शिक्षण याविषयी डॉक्टर राजेश गोरे, डॉ. जगन्नाथ कापसे यांनी छंद, सतीश भापकर यांनी इंग्रजी या विषय माहिती सांगितली. सदरील शिक्षण परिषदेत बालाच्या गोष्टी या पुस्तिकेचे प्रकाशन माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. संपादकीय मंडळ डॉ.भागिरथी गिरी, भगवान फुलारी, विशाल दशवंत, प्रभाकर हिप्परगे, सतिश भापकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी चाकूर तालुक्यातील बाला उपक्रमाचे उत्कृष्ट कार्य केलेल्या केंद्रीय प्राथमिक शाळा आटोळा, प्राथमिक शाळा घरणी, प्राथमिक शाळा आष्टामोड, प्राथमिक शाळा ब्रह्मवाडी, प्राथमिक शाळा रायवाडी या शाळांच्या मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला. जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेत यशस्वी झालेल्या सरिता संधीकर, संतोष सुतार, प्रमोद हडगे, बालासाहेब कांबळे, ज्योती गाढ्गे, अनिता खडके, भरत सोनवणे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी पीएचडी प्राप्त केल्याबद्दल डॉ. सतीश सातपुते, डॉ.स्मिता मामीलवाड यांचा सत्कार करण्यात आला. माझी माय मंगल कार्यालयाचे मालक राजकुमारअण्णा हराळे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्तीबद्दल बाबुमिया पठाण व आर.एन.जाधव यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला . जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे संतोष ठाकूर, निशिकांत मिरकले, शरीफ शेख, सुनील राजुरे, गिरीश माने, आयुब शेख यांच्यासह गटशिक्षणाधिकारी संजय आलमले, गटसमन्वयक बालाजी बावचे, सर्व विषय तज्ञ साधन व्यक्ती, केंद्रप्रमुख, केंद्रीय मुख्याध्यापक, शिक्षक यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रमोद हडगे यांनी केले तर गटशिक्षणाधिकारी संजय अलमले यांनी सर्वांचे आभार मानले.